
# सप्टेंबर २०२४चे राशी भविष्य - भाद्रपद महिना- शुक्ल आणि कृष्ण पक्ष

## लेखक - अजय तनखीवाले




**पार्श्वभूमी:** या महिन्यात रवी सिंहेत असल्यामुळे बरीच राजसी आणि उच्च पातळीची कार्ये तुमच्या हातून घडतील. पण १८ सप्टेंबरला चंद्र ग्रहण तुमच्या पदरात निराशा घालतील.
२ ऑक्टोबरचे सूर्यग्रहण हे सुद्धा भाद्रपदातच आहे.
या महिन्यात शनि, हर्षल, नेपच्युन, प्लूटो हे ग्रह वक्री आहेत व वर्चस्व दाखवणार. शुक्र केतु जोडी कन्या राशीत असल्यामुळे, तुमच्या कलांना थोडे रुक्ष करेल. कन्येत रवी शुक्र, केतु युती आणि रवी बुद्ध केतू युती आणि चंद्रग्रहण आहे. उत्तरार्धात शुक्र कलाकारांना साथ देणार.


**उत्सव:** भाद्रपद मासात गणपती उत्सव हे समारंभ होतील. या शिवाय हरितालिका ऋषि पंचमी, गौरी पूजन, गौरी विसर्जन, अनंत चतुर्दशी होणार. शेवटी १८ सप्टेंबर श्राध्द आरंभ. शिवाय २ ऑक्टोबरला सर्व पित्री अमावस्या आहे .
**महत्वाच्या तारखा:** अमावस्या- २ सप्टेंबर, पौर्णिमा– १७ सप्टेंबर.

२.०: महिन्यातील गोचर ग्रह व युती: १. मकरेत प्लुटो, २. कुंभेत शनि, ३. रवि सिंहेत, ४. शुक्र, केतू कन्या राशीत, ५. गुरू, हर्षल वृषभेत, ६. राहू, नेपच्यून मिनेत. ७. केतू कन्या राशीत आहे.

१.२ – २ सप्टेंबर रोजी ची कुंडली व १७ सप्टेंबर ची कुंडली


| २ सप्टेंबर ची कुंडली | १७ सप्टेंबर ची कुंडली |
|---|---|








२.०: भविष्य-चंद्र राशी प्रमाणे: (भारतीय पध्दती प्रमाणे वाचावे).

काही लोकांना नक्षत्र माहित असते. दक्षिण भारतात त्यास स्टार म्हणतात. चंद्र राशी बरोबर नक्षत्र आणि चरण दिले आहे. तर राशी आणि नक्षत्र या पैकी जे माहिती असेल तो भाग वाचावा.

| राशी | भविष्य |
|---|---|
| २. १ मेष राशी (Mesh):<br><br><br>अश्विनी, भरणी, कृत्तिका(१) | • *शनि -११वा, गुरु -२रा, राहू -१२वा (अनिष्ठ)*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>    • उत्तरार्धात रोगराई पासून स्वतःला जपा, तुम्ही आपल्या बुद्धिमत्तेतून उपाय काढाल. चंद्रग्रहणा च्या आसपास जास्तच त्रास होईल, पथ्ये पाळा.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • पूर्वार्धात एजन्ट धंदा चालवण्यास मदत करतील. तुम्ही सुद्धा तंत्रज्ञान वापरून नोकरीत उत्कर्ष मिळवाल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • हा महिना स्त्रियांचे राग लोभ सहन करावे लागणार.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • वक्री शनिमुळे गुंतवणुकीत खळबळ व चढ-उतार दिसेल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>    • भावंडांत चढाओढ होताना दिसेल.<br>    • उत्तरार्धात मुलं मोठे टप्पे गाठतील.<br>• *फ . परदेश गमन*<br>    • कठोर परिश्रम करुन परदेशी जाणे शक्य होईल. |
| २.२ वृषभराशी (Vrishabha):<br><br><br>कृत्तिका(२,३,४), रोहिणी, मृग (१,२) | • *शनि -१० वा गुरु -१ला, राहू -११वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>    • उत्तम स्वास्थ लाभेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>    • नोकरी धंद्यात भरभराट होईल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • साथीदार चांगली सोबत देईल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>    • गुंतवणुकी मात्र जपून करा. अशांत चढ-उतार बघाल. ग्रहणात चोरीची शक्यता.<br>• *इ . कौटुंबिक*<br>    • उत्तरार्धात मुलांची कामगिरी बघून प्रसन्न व्हाल.<br>• *फ . परदेश गमन*<br>    • एजंट परदेश गमन घडवेल. |
| २.3 मिथुन राशी (Mithun): | • *शनि -९वा, गुरु -१२वा (अनिष्ठ), राहू – १०वा*<br>• *अ. स्वास्थ्य* |

| | |
|---|---|
| <br>मृग(३,४), आर्द्रा,<br>पुनर्वसु(१,२,३) | ○ उष्णतेचे विकार होण्याची शक्यता. स्थूलपणा आणि मधूमेहाचा त्रास होण्याची शक्यता.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>○ कामावर कारस्थानी लोकांवर बारीक लक्ष ठेवा. ग्रहणात सावध रहा. उत्तरार्धात तुम्हाला साहेबांचा मोठा पाठिंबा मिळेल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>• थोडासा कौटुंबिक कलह होणार पण हा महिना उलटला कि सर्व शांत होईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>• सल्लागार उत्तम वित्तीय नियोजन करतील आणि सध्याचे चढ उतार सांभाळून घेतील.<br>• *इ. कौटुंबिक*<br>• कुटुंबात तुमच्या वर विश्वास ठेवला जाईल आणि त्यांना तुमची मते पटतील. आई वडिलांची काळजी घ्या.<br>• *फ. परदेश गमन*<br>• परदेशात तुमचे काम सर्वांना पसंत पडेल. |
| २.४ कर्क राशी (Karka):<br><br>पुनर्वसु(४), पुष्य, आश्लेषा | • *शनि – ८वा(अनिष्ठ), गुरु-११वा, राहू-९वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>• थोडा ज्वर होण्याची शक्यता आहे.<br>• पूर्वार्ध स्वास्थाला उत्तम काळ. मित्रांची साथ लाभेल.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>• धंद्यांत थोडं वर खाली होणार. सरकारी कायदे कानून पाळा.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>• पूर्वार्ध उत्तम जाईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>• जसे बाजार हलतील तसे तुमच्या बचतीत चढ-उतार होईल. नुकसानाची शक्यता आहे.<br>• *इ. कौटुंबिक*<br>• उत्तरार्धात भावाबहिणीं सोबत सहली व तीर्थक्षेत्र यात्रा कराल. ग्रहणानंतर सुवार्ता मिळेल.<br>• *फ. परदेश गमन*<br>• परदेशी घातपात होण्याची शक्यता. |
| २. ५ सिंहराशी (Simha): | • *शनि – ७ वा, गुरु - १० वा , राहू – ८ वा (अनिष्ठ)*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>• तुमची प्रकृती उत्तम असेल. समाजात लोकप्रियता मिळेल. |

| | |
|---|---|
| <br><br>मघा, पूर्वा, उत्तरा(१) | • *ब. नोकरी/धंदा*<br>  • सल्लागार म्हणून धंदा उत्तम चालेल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • पूर्वार्धात जोडीदाराची साथ मिळेल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  • पैश्याची थोडी नासधूस होईल. ग्रहणा जवळ नुकसानीची चिंता असेल. वास्तू विषयक व्यवहार होतील.<br>• *इ. कौटुंबिक*<br>  • मुले मैदानी खेळ स्पर्धा जिंकतील.<br>• *फ. परदेश गमन*<br>  • शक्यता कमी पण प्रयत्न करायला हरकत नाही. |
| २. ६ कन्या राशी (Kanya):<br><br><br>उत्तरा(२,३,४), हस्त, चित्रा (१,२) | • *शनि – ६ वा (अनिष्ठ), गुरु -९ वा, राहू -७ वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  ○ जीवनात वृक्ष वातावरण येईल पण उत्तरार्धात पुनश्च रंग भरतील.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>  ○ नोकरी धंद्यात तुमचा धाडसी स्वभाव लोकांना आवडेल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • जोडीदारावर संशय घेणे टाळा. ग्रहणा जवळ सर्व बाबतीत दक्षता बाळगा.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  • पूर्वार्धात सल्लागार उत्तम गुंतवणुकी करतील.<br>• *इ. कौटुंबिक*<br>  • आईच्या तब्येतिची काळजी वाटेल.<br>• *फ. परदेश गमन*<br>  • सल्लागार म्हणून परदेशी जाल. |
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br><br>चित्रा(३,४), स्वाती, विशाखा (१,२,३) | • *शनि ५, वा, गुरु ८ वा(अनिष्ठ), राहू-६ वा (अनिष्ठ)*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  • सर्व कामे तब्येत सांभाळून करावी. नैराश्य टाळा.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>  • *उत्तरार्धात एजंट बरीच मदत करतील.*<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • हा मंगल काळ सुखाने घालवाल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  • पैसे गुंतवण्याआधी एजंटचा सल्ला घ्यावा.<br>• *इ. कौटुंबिक* |

| | |
|---|---|
| | • *मुलांचा उत्कर्ष चालू असेल, त्यात थोडे चढाव उतार येतील. उत्तरार्धात भारघोस यश मिळेल.*<br>• *फ. परदेश गमन*<br>  • परदेशी कामगिरी धीटपणाने उरकाल.<br>• |
| २. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):<br><br>विशाखा(४), अनुराधा, ज्येष्ठा | • *शनि – ४ वा, गुरु -७ वा , राहू -५ वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  • स्वास्थ्य  उत्तम असण्याची मजा लुटाल.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>  • पूर्वार्धात तुमचं काम सर्वांना आवडेल. व्यावसायिक लॉटरी लागण्याची शक्यता.<br>• *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • कारकिर्दित दीर्घ कालीन उत्कर्ष होईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  • उत्तरार्धात गुंतवणुकीत फायदा होईल.<br>• *इ. कौटुंबिक*<br>  • मुल गोंधळले असता त्यांना तुमची साथ लागेल.<br>• *फ. परदेश गमन*<br>  • उत्तरार्धात एजन्ट परदेशी संधी निर्माण करतील. |
| २. ९ धनू राशी(Dhanu):<br><br>मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा(१) | • *शनि – ३ रा , गुरु -,६वा (अनिष्ठ), राहू -४था*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  • बारीकसारीक कुरबुरी आणि  कापणे, भाजणे सोडलं तर स्वास्थ्य उत्तम असेल. मधुमेह सारख्या जुन्या व्याधीचा त्रास मात्र चालू असणार.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>  • *नोकरीत  स्त्रियांच्या सहयोगाने मोठे यश मिळवाल.*<br>• *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • या महिन्यात वादविवाद होईल पण मनावर ताबा ठेवा आणि फार टोकाची भूमिका घेऊ नका. वागण्यात, बोलण्यात पथ्य पाळा.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  • *वडिलोपार्जित मालमत्ता, घर याबाबत फसवेगिरी होण्याची शक्यता आहे.*<br>• *इ. कौटुंबिक*<br>  • भावंडाना एकत्र ठेवण्याचा प्रयत्न चालू ठेवा. थोडे वर खाली होईल पण आपल्या बाजूने प्रयत्न करत रहा.<br>• *फ. परदेश गमन*<br>  • परदेशी वाहवाह होईल व लोक तुमचं ऐकतील. |
| २. १० मकर राशी (Makar): | • *शनि -२ रा, गुरु –५ वा, राहु -३ रा* |

| | |
|---|---|
| <br>उत्तराषाढा(२,३,४), श्रवण, धनिष्ठा(१,२) | • *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ *स्वास्थ्य  उत्तम असेल.*<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ नोकरी धंदा छान  चालेल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ *तरुणांना दैवी  प्रचिती होण्याची शक्यता.*<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ दूरदृष्टीने केलेल्या गुंतवणुकी फायदेशीर ठरतील.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  ◦ मुलं निरनिराळया विषयात पारंगत होतील.<br>  ◦ भावंडात थोडा दुरावा निर्माण होईल.<br>• *फ . परदेश गमन*<br>  ◦ परदेशी तुमच्या नावाचा गवगवा होईल. |
| २. ११ कुंभ राशी (Kumbha):<br><br>धनिष्ठा(३,४), शततारका, पूर्वाभाद्रपदा (१,२,३) | • *शनि – १ ला, गुरु – ४ था , राहू – २ रा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ उत्तरार्धात तब्येतीची काळजी घ्या. थोडक्या साठी तोल जाऊ देऊ नका.<br>*ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ नोकरीत तुमचे गुरु मदत करतील आणि आधुनिक तंत्रज्ञान  आत्मसात करून तुम्ही पुढच्या टप्प्याला यायला सुसज्ज असाल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦  उत्तरार्धात जोडीदार सर्व प्रकारे तुम्हाला साथ देईल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ उत्तरार्धात, एजंट गुंतवणुकेसाठी उत्तम संधी आणतील.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  ◦ मुलांचा धाडसीपणा बघून तुमचे उर भरून येईल.<br>• *फ . परदेश गमन*<br>  ◦  शक्यता कमी आहे तरी प्रयत्न करावे. |
| २.१२ मीन राशी (Meena):<br>पूर्वाभाद्रपदा (४),<br>उत्तराभाद्रपदा,<br><br>रेवती | • *अ. शनि – १२ (अनिष्ठ),, वा, गुरु - ३ रा , राहू -१ ला*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ दुसऱ्यावर विश्वास ठेवणे कठीण असते.  तरी मदत करणाऱ्या स्त्रियांवर तुम्ही अवलंबून रहाल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  ◦ धाडसीपणाने नोकरीत वर्चस्व गाजवाल.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ जोडीदार फारच प्रिय भासेल. वाद टाळा. |

| | |
|---|---|
| | • *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  • उत्तरार्धात उत्तम प्रकारच्या जमिनीचा सौदा कराल. ग्रहणाजवळ उगाचच अस्वस्थ राहाल.<br>• *इ. कौटुंबिक*<br>  • भावंडांचा तुमच्यावर विश्वास असेल.<br>  • आईशी वादविवाद टाळा.<br>• *फ. परदेश गमन*<br>  • शिक्षक किंवा सल्लागार  म्हणून परदेशी जाल. |